MHST200006492020

**<u>वि.दि.दा.क्र.११९/२०२३ मधील निशाणी क्र.१०५ वरील आदेश</u>**

वादी यांनी सदरचा अर्ज नि.क्रं.७४ व ९७ वर त्यांचेविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, काही अपरिहार्य कारणामुळे ते न्यायालयात गैरहजर होते. त्यामुळे त्यांचेविरुद्ध नि.७४ व ९७ वर उलटतपास नाही आदेश पारीत झालेले आहेत. तसेच नि.क्रं.१ वर पुरावा बंद आदेश झालेला आहे. सदरचा उलटतपास नाही आदेश रद्द केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही याउलट वादी यांचे फार मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजुर करावा.

३. प्रतिवादींचे असे कथन आहे की, दि.१६.०६.२०२४ रोजी नि.क्रं. १०२ नुसार पुरावा बंद आदेश झालेला आहे. त्यानंतर दि.१६.०६.२०२५ रोजी नि.क्रं.७४ व ९७ वर वादीचा पुरावा बंद आदेश झालेला आहे. त्यामुळे वादी त्याच कारणावरुन वेळोवेळी मुदती घेऊन कामकाजास विलंब करीत आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज रद्द करणेत यावा व मंजुर करावयाचे झालेस जास्तीत जास्त दंड आकारणेत यावा.

४. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. सदर दावा जाहीर ठराव, निरंतर ताकीद व कब्जा मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. सदर वादींविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द केल्यास

दाव्यातील सर्व वाद मुद्दयांचे निवारण गुणावगुणांवर होण्यास मदत होणार आहे. वाद मुद्दयांचे निवारण गुणावगुणांवर झाल्यास उभय पक्षकारांदरम्यान असलेला वाद कायमस्वरुपी संपणार आहे. उलटतपास नाही आदेश रद्द केल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. प्रस्तुतकामी वादी क्रं.२ हिने तिची सरतपासाची प्रतिज्ञापत्रे दि.२५.०६.२०१८ रोजी नि.क्रं.७४ नुसार व दि.०४.०७.२०२२ रोजी नि.क्रं.९७ नुसार दाखल केलेली आहेत. वादी क्रं.२ हिचेविरुद्ध उलटतपास नाहीचा आदेश दि.१६.०६.२०२५ रोजी अनुक्रमे नि.७४ व ९७ वर झालेला आहे. सदरचा अर्ज दि.२९.०९.२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत वादीला उलटतपास नाही आदेश रद्द करण्यासाठी तीन महिन्यांचा विलंब झालेला आहे असे दिसुन येते. सदर विलंबाची भरपाई म्हणुन खर्चाची रक्कम वादींवर लावणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजुर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :

## <u>आदेश</u>

१) अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/- (रक्कम रुपये पाचशे फक्त) प्रतिवादींना दयावी.

३) वरील खर्चाची पुर्तता झालेनंतर वादी यांचेविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द करणेत येतो.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.11.01 17:59:15 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : २८/१०/२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.